नि.फौ.ख.क्र.११६/२०२४
सरकार-वि- वसंत
नि.क्र. १४

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष शपथेवर सुरु -**

माझे नाव- देविदास लच्छमा आत्राम,

वय – ५० वर्षे, व्यवसाय - शेतमजुर,

राहणार – कातलाबोडी, ता.कोरपना, जि. चंद्रपुर.

**विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्त्या श्रीमती टि.बी.नेवारे यांचेमार्फत सरतपास-**

घटना कोणत्या वर्षीची आहे हे मला माहिती नाही. घटनेविषयी मला काही माहिती नाही. आरोपीला मी ओळखतो, तो माझा मामा आहे. पोलीसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

**(साक्षीदार हा बयानातील मजकूराशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्त्या यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे अभियोगपक्षास उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

२. हे मला आठवत नाही की, दिनांक २६.०५.२०२४ रोजी माझ्या घरी भिवसन देवाचा कार्यक्रम होता. साक्षीदार स्वत: सांगतो की, माझ्या घरी कार्यक्रम होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी कार्यक्रम असल्यामुळे मी गावच्या लोकांना आमंत्रण दिले होते. हे मला माहिती नाही की, त्या कार्यक्रमामध्ये संदिप आत्राम व मंगेश सिडाम हजर होते. हे मला माहिती नाही की, त्यावेळेस मी जेवण वाढत असतांना, धर्मा कुमरे तेथे आले होते. हे मला माहिती नाही की, धर्मा कुमरे माझ्या अंगणात उभा असतांना, वसंत सिडाम याने त्याला विचारले की, तू जेवणाला इथे कसा काय आला, असे म्हणुन शिवीगाळ केली व धक्का दिला. हे मला माहिती नाही की, वसंत सिडाम याने विट घेऊन धर्मा कुमरे याच्या डोक्याला मारले होते व मारण्याची धमकी दिली होती. हे मला माहिती नाही की, त्यांचा वाद गावक-यांनी सोडविला होता, त्यानंतर धर्मा कुमरे याने वसंत सिडाम यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिली होती.

३. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग-अ वाचुन दाखविला, तो बरोबर नाही, पोलीसांनी सदर मजकुर माझ्या बयाणात का नमुद केला, याचे कारण मला

माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा नातेवाईक लागत असल्यामुळे, मी त्याला वाचविण्याकरिता आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपासपूर्ण.**
**आरोतीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.बी. मुसळे वकील साहेब यांनी नाकारला.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा./-
**(दिक्षा दिलीप सहारे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(२ रे कोर्ट), कोरपना.

दि.१३/०४/२०२६